# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.01.2025** **वारःमंगळवार**

1. प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्याला उत्साहात सुरुवात; पहिल्या दिवशी दीड कोटी भविकांनी केलं पवित्र स्नान
2. सोयाबीन खरेदीला 31 जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची केंद्रीय कृषी मंत्र्यांची घोषणा
3. शक्तिपीठ महामार्गाचं काम सुरु करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश आणि
4. खो खो विश्वचषक स्पर्धेत नेपाळवर मात करत भारतीय पुरुष संघाची विजयी सलामी

**महाकुंभ मेळा**

पौष पौर्णिमेच्या मुहूर्तावर उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्याला कालपासून पहिल्या पवित्र स्नानानं सुरुवात झाली. आज सकाळी होणाऱ्या अमृत स्नान सोहळ्याचं थेट प्रसारण आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून सहक्षेपित केलं जाणार आहे. 26 फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महाकुंभात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येनं भाविक जमले असून काल दीड कोटी भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याचं वृत्त आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिलं आहे. हा महाकुंभ जगातला सर्वांत मोठा सांस्कृतिक आणि धार्मिक मेळावा असून, भारतीय आध्यात्मिक पंरपरेचा विराट उत्सव आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान-मुंबई दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात त्यांच्या हस्ते मुंबईतल्या नौदलाच्या गोदीत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी राष्ट्राला अर्पण करण्यात येणार आहेत. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका एकाचवेळी नौदलात सामील होणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते नवी मुंबईत खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहन मंदिराचं उद्घाटनही होणार आहे.

**केंद्रीयमंत्री राजीव रंजन सिंह**

देशातील ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी पशुधन विकास महत्वपूर्ण घटक आहे; पशुधन वाढीच्या माध्यमातून उत्पादन वाढवल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था निश्चितच सुधारेल, असा विश्वास केंद्रीय मत्स्यपालन, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी काल पुण्यात व्यक्त केला. पिंपरी चिंचवडमध्ये झालेल्या उद्योजकता विकास परिषदेत ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री एस. पी सिंग बघेल, राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी बोलताना राजीव रंजन सिंह म्हणाले....

**सोयाबीन खरेदी**

सोयाबीन खरेदीसाठी येत्या 31 जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची घोषणा केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल केली. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून घेतलेल्या या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान आणि केंद्रीय कृषीमंत्र्यांचे आभार मानले आहेत. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी काल इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पर्यटन, शिक्षण, पणन, सार्वजनिक बांधकाम विभाग अशा विविध विभागांच्या आगामी शंभर दिवसातील कामकाजाचा आढावा घेतला. पणन विभागाकडून दरवर्षी करण्यात येणारी सोयाबीन खरेदी कोणत्याही अडथळ्याशिवाय होण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याची सूचना त्यांनी

पणन विभागाला दिली. समृध्दी महामार्गालगत अग्रो हब उभारावेत, तसंच कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळींची संख्या वाढवावी अशा सूचनाही त्यांनी केली. विविध नवमाध्यमांचा प्रभावी वापर करून शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येईल, असंही फडणवीस यांनी अन्य एका बैठकीत सांगितलं.

**<u>शक्तीपीठ महामार्ग</u>**

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचं नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेनं सुरु करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. समृद्धी महामार्गाचं उर्वरित अंतिम टप्प्याचं काम तत्परतेनं पूर्ण करुन फेब्रुवारीपर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा, तसंच मंत्रालय परिसरात नवीन सात मजली इमारत उभारण्याच्या कामाची सुरवात येत्या शंभर दिवसात करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**<u>नाशिक-अपघातातील मदत</u>**

नाशिकमध्ये द्वारका भागात परवा रात्री झालेल्या भीषण अपघातात मरण पावलेल्यांची संख्या आता सात झाली आहे, तर 13 जण जखमी झाले आहेत. राज्य शासनानं मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींवरील उपचाराचा खर्चही शासनातर्फे करण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं आहे. दरम्यान या अपघात प्रकरणी पोलीसांनी यासंदर्भात वाहन चालक, मालक आणि स्टील पुरवठादार कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**<u>मकर संक्रांत</u>**

राज्यात सर्वत्र मकरसंक्रांतीचा सण आज उत्साहानं साजरा होत आहे. देशाच्या विविध भागात लोहडी, पोंगल, माघ बिहू, मकरसंक्रात अशा विविध नावांनी हा सुगीचा उत्सव साजरा केला जातो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांनी या सणानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. मकर संक्रांतीनिमित्त देशभरात विविध ठिकाणी पतंग महोत्सवाचं आयोजन ही करण्यात आलं आहे. राज्यात अहिल्यानगरमध्ये पतंग महोत्सव उत्साहात साजरा होत असून, विविध स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या आहेत. पतंगाच्या मांज्यामुळं होणारे अपघात टाळण्यासाठी धारदार मांज्या न वापरता साधा दोरा वापरावा असं आवाहन पोलीस विभागानं आणि प्रशासनानं केलं आहे.

**<u>नितीन उदास गुलाबी रिक्षा</u>**

महिलांना रिक्षा व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणारी पिंक ई-रिक्षा योजना राज्य सरकारनं सुरू केली आहे. आर्थिक दुर्बल महिलांना सक्षम बनवण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण असल्याचं पुणे महापालिकेचे उपायुक्त आणि समाज विकास विभागाचे प्रमुख नितीन उदास यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.....

**<u>ब्रेलवाचन-यवतमाळ</u>**

यवतमाळच्या भूमिका राय या इयत्ता आठवीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थिनीने ब्रेल लिपीतील पुस्तकांचं सलग साडे बारा तास वाचन करून जागतिक विक्रम केला आहे. राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी सकाळी 8 वाजल्यापासून तिने पुस्तक वाचन सुरू केलं. वाचन संस्कृती जिवंत ठेवण्याचा संदेश भूमिकानं दिला आहे.......

**<u>शाकंभारी-धारशिव, सातारा, सोलापूर</u>**

तुळजापूर इथं तुळजा भवानीच्या शाकंभरी नवरात्राची काल सांगता झाली. यावेळी मंदिरातील होमकुंडावर सर्व वैदिक धार्मिक विधी करण्यात आले. महाराष्ट्रासह आंध्र आणि कर्नाटकातील लाखो भाविकांचं श्रद्धास्थान असणाऱ्या मांढरदेव गडावरील श्री काळेश्वरी देवीच्या यात्रेचा मुख्यं दिवसही काल लाखो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. सोलापुरचं ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धेश्वर महाराज यात्रेतील अक्षता सोहळाही काल पारंपरिक पद्धतीनं विधीवत पार पडला.

**महाराष्ट्र केसरी स्पर्धा-अहिल्यानगर**

अहिल्यानगर इथं 29 जानेवारी ते 2 फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी बलभीमअण्णा जगताप क्रीडानगरीमध्ये काल केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते कुस्तीच्या मैदानाचं मातीपूजन करण्यात आलं. महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी एक कोटी रुपये देण्याचा तसंच महाराष्ट्र केसरी आणि हिंद केसरींच्या पुरस्कार रकमेतही वाढ करण्याचा निर्णय शासनानं यापूर्वीच्या स्पर्धेच्यावेळी घेतला असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं.

**खो-खो विश्वचषक**

भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या सहकार्याने भारतीय खो-खो महासंघातर्फे आयोजित खो-खो विश्वचषक स्पर्धेला काल नवी दिल्लीत इंदिरा गांधी इनडोअर मैदानावर सुरुवात झाली. 19 जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत 20 पुरुष आणि 19 महिला संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात भारतीय पुरुष संघानं काल नेपाळवर 42-37 अशी मात करत विजयी सलामी दिली. भारतीय महिला संघाचा पहिला सामना आज दक्षिण कोरियाच्या संघाशी होणार आहे. दरम्यान, या स्पर्धेसाठी विशेष बाब महाराष्ट्र सरकारनं म्हणून दहा कोटी रुपयांचा निधी दिला आहे.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## याबरोबरच हे प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.